मुल शहरातील राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला गती; आ. सुधीर मुनगंटीवार यांचे अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याचे निर्देश

एसटीएमसी अंतर्गत ४ कोटी ७ लाख रुपये निधीतून २.७९७ किमी रस्त्याची सुधारणा; निविदा प्रक्रिया पूर्ण, कामाची होणार लवकर सुरुवात

दुभाजक, आर.सी.सी. नाली, पॅनेल रिप्लेसमेंट, रोड मार्किंगसह विविध सुरक्षा उपाययोजनांचा समावेश; काम गुणवत्तापूर्ण व विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश

चंद्रपूर : मुल शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ९३०च्या देखभाल व दुरुस्तीच्या कामाला आता गती मिळणार असून, या कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. शासकीय विश्रामगृह, चंद्रपूर येथे राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंदर्भात आयोजित बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोलीचे कार्यकारी अभियंता केळकर, उपविभागीय अभियंता बोबडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

STMC सन २०२५-२६ अंतर्गत ४ कोटी ७ लाख ३० हजार रुपयांच्या निधीतून २.७९७ किलोमीटर लांबीच्या रस्ता सुधारणा कामाला मंजुरी मिळाली आहे. या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून काम सुरू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी बैठकीत दिली. त्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे आणि निर्धारित १२ महिन्यांच्या कालावधीत उच्च गुणवत्तेसह काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

या कामामध्ये सुमारे २.५० किलोमीटर लांबीचा दुभाजक विकसित करून त्याचे रंगकाम, ३०० मीटर लांबीच्या आर.सी.सी. नालीचे बांधकाम, खराब झालेल्या रस्त्याच्या भागांचे पॅनेल रिप्लेसमेंट तसेच पेव्हिंग ब्लॉक बसविण्याची कामे करण्यात येणार आहेत. रस्त्यावर निर्माण झालेल्या भेगांची क्रॅक्स स्टेपलिंग व क्रॉस स्टिचिंग तंत्रज्ञानाद्वारे दुरुस्ती करण्यात येणार आहे.

याशिवाय वाहनचालकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संपूर्ण २.७९७ किलोमीटर अंतरावर थर्मोप्लास्टिक पेंटने रोड मार्किंग, आवश्यक ठिकाणी दिशादर्शक व इशारा फलक, रात्रीच्या वेळी दृश्यमानता वाढविण्यासाठी कॅट आयज, वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी रंबल स्ट्रिप्स तसेच आवश्यक रोड फर्निचर उभारण्यात येणार आहे. रस्त्यालगत वाढलेली झुडपे छाटून दृश्यमानता सुधारण्याचे कामही करण्यात येणार आहे.

मुल शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने रस्त्याची गुणवत्ता आणि सुरक्षितता या दोन्ही बाबींना विशेष महत्त्व आहे. त्यामुळे मंजूर निधीचा योग्य विनियोग करून काम दर्जेदार पद्धतीने आणि वेळेत पूर्ण झाले पाहिजे, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. बैठक केवळ आढावा घेण्यापुरती न राहता प्रत्यक्ष कामाला गती देण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवरही यावेळी सविस्तर चर्चा झाली.